

**अधिक माहितीसाठी संपर्काचा पत्ता**


**उद्यानविद्यावेत्ता**

अ.भा.स.म.पि.योजना

उद्यानविद्या विभाग, कृषि महाविद्यालय, दापोली.


मसालापिके घडीपत्रिका क्र. ३

# कॅशियाची सुधारीत जात - कोकण कॅशिया लागवड तंत्रज्ञान




डॉ. राजन खांडेकर

डॉ. उदयकुमार पेठे

डॉ. राजेश राठोड

डॉ. भरत साळवी

डॉ. पराग हळदणकर

**अखिल भारतीय समन्वित मसाला पिके संशोधन योजना,**

**उद्यानविद्या विभाग, कृषि महाविद्यालय, दापोली,**

**जि. रत्नागिरी.**

**डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली**

मसाला पिकातील कॅशिया हे अतिशय काटक झाड आहे. कॅशियाची साल सर्वसाधारणपणे वापरली जाते. मात्र कॅशियाची साल ही दालचिनी म्हणून वापरली जाते. या सालीमध्ये तिखटपणा जास्त असतो. तसेच ती दालचिनीपेक्षा काढायला सोपी असते. ती दिसायला दालचिनी सारखी दिसते. मात्र दालचिनी तिखट गोड आणि मधूर असते कॅशिया तिखट असते.

**हवामान** :— उष्ण व दमट हवामान.

**झाडातील अंतर :—**१.२० x १.२० मीटर

**लागवड :—**जून महिन्याच्या सुरूवातीला अथवा पावसाळयानंतर लागवड करावी.

**सुधारीत जात :— कोकण कॅशिया**

ही कॅशिया दालचिनी प्रकारातील नविन जात आहे. याचे सालीचे उत्पन्न १०० ग्रॅम/झाड असते. सालीमध्ये क्यूमारीनचे प्रमाण कमी असते. १९.९ मिलीग्रॅम/किलो. ही जात नारळ सुपारीचे बागेत आंतरपीक म्हणून लागवडीस उत्तम आहे. सालीमध्ये तेलाचे प्रमाण चांगले असते २.४०: तसेच ही राष्ट्रीय पातळीवर विकसीत झालेली कॅशियाची पहिली जात असून तिचे गुणधर्म उत्तम आहेत म्हणून ही जात लागवडीसाठी प्रसारीत करणेत आली आहे.

**खते :—**

पहिल्या वर्षी प्रत्येक झाडास २० ग्रॅम नत्र, २० ग्रॅम स्फुरद व ५० ग्रॅम पालाश हे अन्न घटक दोन समान हप्त्यात विभागून द्यावे. दहा वर्षापासून प्रत्येक झाडास ५० किलो शेणखत, १ किला युरिया, ६५० ग्रॅम सिंगल सुपर फॉस्पेट व १ किलो म्युरेट ऑफ पोटॅश द्यावे.

**आकार देण्यासाठी छाटणी :—**लागवड केल्यानंतर कलम ३ वर्षे वाढू द्यावे. त्यानंतर येणाऱ्या
ऑक्टोबर महिन्यात झाडाचे खोड जमिनीपासून २० सेमी. उंचीवर करवतीने कापावे. कापलेल्या फांद्यावरील साल व गर्द हिरवी पाने काढून सावलीत वाळवावी.

**फांद्या काढणे :—**मुख्य खोड कापल्यानंतर पुढील दोन वर्षे शिल्लक असलेल्या बुंध्यावर असंख्य धुमारे (फांद्या) फुटतात तिसऱ्या वर्षाच्या ऑक्टोबर महिन्यात प्रत्येक झाडावरुन २—३ फांद्या काढायला मिळतात. त्यानंतर दरवर्षी दिड ते दोन मीटर उंचीच्या २—३ फांद्या प्रत्येक झाडावरुन काढायला मिळतात. कापलेल्या सर्व फांद्या शक्य तितक्या लवकर निवाऱ्याच्या ठिकाणी आणाव्या.

**साल काढणे :—**फांद्या झाडावरुन काढल्यानंतर १—२ तासात साल काढावी. चाकूने साल लाकडापासून सैल करुन सालीच्या पट्टया हाताने ओढून काढाव्या.

**साल काढणी आणि प्रक्रिया :—**साल काढल्यावर सरळ रहावी म्हणून वाळलेल्या काठीवर बांधावी आणि ४—५ दिवस स्वच्छ सुर्यप्रकाश असेल अशा जागी सावलीत वाळवावी.

**रोग व किड नियंत्रण** :— पाने खाणारी अळी व लिफ मायनर (नागिन) या दोन किडीचा कधीतरी उपद्रव होतो. कोवळे पान कुरतडलेले आढळून आल्यास अळी शोधून मारावी. नागमोडी रेषा ज्या कोवळया पानांवर दिसतात ते पान तोडून नष्ट केल्यास पानाच्या आत असलेल्या लिफ मायनर या किडीचा उपद्रव संपतो.